# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांकः- २०/०२/२०१८

महाराष्ट्र शासनाने सन-१९९२ पासून गडचिरोली हा दारु मुक्ती जिल्हा म्हणून घोषीत केला असतांना सुध्दा गडचिरोली जिल्हयातील काही अवैध दारु विक्रेते हे त्यांचे आर्थिक फायदयाकरीता शेजारील राज्यातून तसेच लगतच्या जिल्हयातून दारुची बेकायदेशिर वाहतुक करुन अवैध विक्री करीत असल्याने अवैध दारु विक्रेत्यांवर आळा बसविण्याकरीता मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे अधिनस्त स्थानिक गुन्हे शाखेकडे अवैध दारु वाहतुक, विक्री संबंधात कारवाई करण्यासाठी महत्वाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्रेत्यांवर आळा घालण्यासाठी त्यांचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये कायदेशिर कारवाई करणे संबंधात स्थानिक जनतेकडून खात्रीशीर माहिती अवगत करुन घेण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेशी संपर्क साधुन माहिती देण्याकरीता मोबाईल क्रमांक ७७४५८५९५०० तसेच ९४०५११४९४५ कार्यान्वयित करण्यात आले आहेत. तरी नागरिकांनी सदर संपर्क क्रमांकावर संपर्क साधुन योग्य माहिती दयावी जेणे करुन अवैध दारु विक्री करणाऱ्या इसमांवर वेळीच योग्य ती कायदेशिर कारवाई करणे सोईस्कर होईल असे आवाहन गडचिरोली पोलीस विभागातर्फे करण्यात येत आहे.